# महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईन्ट,
मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : (०२२) २०२५३५४
२०२६२४९, २८३५२४७
तार : पाणी मंडळ
फॅक्स : (९१)०२२-२०२९३४८

क्र.सभा/मुप्रअ/94/(31)/आ-1/आ-4/

दिनांक : 2 मे 1996.

विषय :- दिनांक 29.3.96 (शुक्रवार) रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या 68 व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची 68 वी सभा, शुक्रवार दिनांक 29.3.1996 रोजी सकाळी 10 वाजता मंडळाचे अध्यक्ष व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली, मा. मुख्यमंत्री यांचे सभागृह कक्षात घेण्यांत आली. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत मंजूरीस्तव सादर करीत आहे.

(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव.

मंडळाचे अध्यक्ष व मा.मुख्यमंत्री.

मा. प्रधान सचिव (पाणी पुरवठा) यांनी कृपया बघावे

मंडळाचे अध्यक्ष व मा. मुख्यमंत्री

मु. मं. स. प्राप्त झाले

# महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ

दिनांक २९.३.१९९६ (शुक्रवार) रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या ६८ व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची ६८ वी सभा शुक्रवार दिनांक २९.३.१९९६ रोजी सकाळी १० वाजता मंडळाचे अध्यक्ष व मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन, यांचे अध्यक्षतेखाली मा. मुख्यमंत्री, यांचे सभागृह कक्षांत घेण्यांत आली. सदरहू सभेस विशेष निमंत्रित म्हणून मा.ना.श्री. आण्णासाहेब डांगे, मंत्री, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग हे उपस्थित होते. सदरहू सभेस मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते :-

१. मा.ना.श्री. मनोहर जोशी,
अध्यक्ष, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ व मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन.

२. मा.ना.श्री. आण्णासाहेब डांगे,
मंत्री, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता (विशेष निमंत्रित).

३. मा.श्री.व्ही.रंगनाथन,
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (विशेष निमंत्रित)

४. मा.श्री.अेम.आर.अग्रवाल,
सदस्य, म.पा.पु. व ज.नि.मंडळ.

५. मा.श्री.अेम.के.गोखले,
सदस्य, म.पा.पु.व ज.नि.मंडळ.

६. मा.श्री. के.नलिनाक्षन,
सदस्य व प्रधान सचिव, नगर विकास विभाग.

७. मा.श्री. चौ.गो.चाबुकस्वार,
सदस्य व उप सचिव, वित्त विभाग.

८. मा.श्री. मधुसूदन टांकसाळे,
सदस्य, म.पा.पु.व ज.नि.मंडळ व
आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

९. मा.श्री. राजेंद्र मा. सगणे,
सदस्य सचिव,
महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ.

मंडळाच्या सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांच्या रजेस मंजूरी देण्यांत आली.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाचे, खालील अधिकारी विशेष निमंत्रीत म्हणून उपस्थित होते.

१. श्री.शे.दौ.अरमाळ, मुख्य अभियंता (प्रकल्प).
२. श्री. दि.के.भसाळे, मुख्य अभियंता (नागरी).
३. श्री. सं.वि.शेळकीकर, मुख्य अभियंता (ग्रामीण).
४. श्री. सु.का.पाटील, मुख्य अभियंता (जागतिक बँक).
५. श्री. ज.बांआंबेगावकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी.
६. श्री. भा.आ.डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी.

मंडळाचे सदस्य सचिव श्री. राजेंद्र सगणे, यांनी प्रथम माननीय नामदार श्री. मनोहर जोशी, अध्यक्ष, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ व मुख्यमंत्री यांना सर्व सदस्यांची ओळख करुन दिली व सर्व उपस्थितांचे स्वागत केले. नंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र. १ :-** महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि. मंडळाच्या ६७ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

मंडळाच्या दि. २.९.९५ रोजी झालेल्या ६७ व्या सभेचे इतिवृत्त मंडळाचे सभासदांना, पत्र क्र.मपापुवजनिमं/१0९५/६७/आ-४, दिनांक २८.११.९५ द्वारे पाठविण्यांत आले होते. त्यास कोणत्याही सदस्यांनी सुचना अगर दुरुस्ती सुचविली नाही असे सदस्य सचिवांनी अध्यक्षांच्या निदर्शनास आणले, त्यानंतर अध्यक्षांनी इतिवृत्तात काही बदल हवेत काय अशी सदस्यांना विचारणा केल्यानंतर सदस्यांनी कोणताही आक्षेप घेतला नाही व इतिवृत्तास मान्यता देण्यांत आली व ६७ व्या सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यांत आले.

**कार्यक्रम बाब क्र.२ :-** मंडळाच्या दि. २.९.९५ रोजी झालेल्या ६७ व्या बैठकीत मंजूर झालेल्या कार्यक्रम बाबींवर करण्यांत आलेली कार्यवाही व त्याबाबत शासनास पाठविलेल्या प्रस्तावांची सद्यस्थिती याची माहिती सदस्य सचिव यांनी दिली. त्यावर मा. अध्यक्षांनी सूचित केले की, पुढच्या बैठकीच्या वेळी मंडळाने शासनास मंजूरीकरिता पाठविलेल्या प्रस्तावासंबंधीची शासनाने केलेली कार्यवाही व सद्यस्थिती सादर करण्यांत यावी. त्याप्रमाणे कार्यवाही करण्याची नोंद घेण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.३(अ) :- सुधारित अंदाजपत्रक सन १९९५-९६.**

सन १९९५-९६ च्या सुधारीत अंदाजपत्रकावर चर्चा होऊन, त्यास मान्यता देऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

ठराव :

**"मंडळ खालील सुधारीत महसूल व भांडवली आयव्यय वित्तीय वर्ष १९९५-९६ साठी मान्य करीत आहे."**

सुधारीत अंदाजपत्रक [१९९५-९६].

| | |
|---|---|
| १] महसूली मिळकत. | रु. १८७२७.०० लाख. |
| २] महसूली खर्च. | रु. १८६५४.९६ लाख. |
| ३] भांडवली मिळकत. | रु. ३५९३९.०० लाख. |
| ४] भांडवली खर्च. | रु. ३५९३९.०० लाख. |

कार्यक्रम बाब क्र.३ [ब] :- वित्तीय वर्ष १९९६-९७ चे अंदाजपत्रक.

वित्तीय वर्ष १९९६-९७ च्या अंदाजपत्रकावर चर्चा करुन, त्यास मान्यता देऊन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

ठराव :

" मंडळ सन १९९६-९७ चा महसुली व भांडवली आय-व्यय खालीलप्रमाणे मान्य करीत आहे."

अंदाजपत्रक १९९६-९७

| | |
|---|---|
| १. महसुली मिळकत. | रु. २२७६३.०० लाख. |
| २. महसुली खर्च. | रु. २२५३३.०० लाख. |
| ३. भांडवली मिळकत. | रु. ५९५४६.०० लाख. |
| ४. भांडवली खर्च. | रु. ५९५४६.०० लाख. |

वरील ठरावास मंजुरी देताना, भांडवली [योजनेवरील] खर्चाचे अंदाजपत्रक फारच कमी असल्यामुळे सुमारे रु. १५०० ते २००० कोटींचे अंदाजपत्रक लवकरात लवकर तयार करुन मंडळापूढे मांडावे अशा सुचना मा. अध्यक्षांनी केल्या व हया सुचनांना मा.ना.श्री. डांगे, ग्राम विकास व पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्री यांनी दुजोरा दिला.

कार्यक्रम बाब क्र.४:- सन ९४-९५ च्या लेख्यांना मान्यता देणेबाबत.

सन १९९४-९५ च्या लेख्यांना मान्यता देताना मा.अध्यक्षांनी लेखे मराठीत देखील तयार करावेत असे सुचविले. यावर सदस्य सचिवांनी नमुद केले की, सन १९९५-९६ वर्षापासुनचे लेखे दोन्ही भाषेत इंग्रजी व मराठी तयार करण्यांत येतील. यानंतर १९९४-९५ च्या लेख्यांना मान्यता देऊन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आले.

ठराव :

असा ठराव करण्यांत येतो की,

१] १९९४-९५ चे वार्षिक लेखे स्विकारुन मान्यता देण्यांत येत आहे.

२] आणि असाही ठराव करण्यांत येत आहे की, १९९४-९५ या वर्षाचे लेखे मंडळाच्या वतीने अध्यक्ष व सदस्य सचिव यांनी अधिप्रमाणित करावेत.

३) तसेच असाही ठराव करण्यांत येतो की, स्विकृत करण्यांत आलेल्या लेख्यांमध्ये ज्याच्यामुळे त्याच्या माहीतीत महत्वाचा फरक पडत नाही अशा किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती लेख्यामध्ये मंडळाचे सदस्य सचिव व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांच्या स्वाक्षरीने करता येतील.

४) खालील विनियोजन मान्य करकण्यांत यावेत असाही ठराव करण्यांत येत आहे.

(अ) रु. १०५७.९७ लाख इतकी रक्कम घसारा निधीकडे विनियोजित करण्यांत यावी.

(ब) रु. २०९.१४ लाख इतकी रक्कम कर्ज निवारण निधीकडे विनियोजित करण्यांत यावी.

<u>कार्यक्रम बाब क्र.५(अ)</u> :चिखली वाढीव पाणी पुरवठा योजनेस आयुर्विमा महामंडळाचे कर्ज उभारणे.

सदस्य सचिव यांनी प्रस्ताव मांडताना नमूद केले की, कर्ज मंजूर झाले आहे. त्या संबंधातील करार करण्याकरिता मंडळाच्या मान्यतेची आवश्यकता असते. मंडळाने खालीलप्रमाणे ठराव संमत केला.

<u>ठराव :</u>

असा ठराव करण्यांत येतो की, आयुर्विमा महामंडळाचे पत्र क्र. आयएनव्हीपीएसडी/ दिनांक १३.३.९६ (परिशिष्ट "अ") अन्वये चिखली वाढीव पाणी पुरवठा योजना (पेन टाकळी पाटबंधारे प्रकल्प) अंदाजित खर्च रु. १५०४.८२ लाख या योजनेस मंजूर केलेले रु. ३३३.२२ लाख कर्ज योजनेच्या प्रगतीनुसार टप्पा टप्प्याने उभारणीसाठी या पत्रातील अटी व शर्ती मान्य करुन मंडळाची सामान्य मुद्रा (कॉमन सील) उठवून करारनामा सादर करण्यासंबंधात मंडळाचे सदस्य सचिव/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

<u>कार्यक्रम बाब क्र.५(ब)</u> :सन ९५-९६ मध्ये म.पा.पु.व ज.नि.योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकडून योजनंतर्गत कर्ज उभारणी.

सदस्य सचिव, यांनी प्रस्ताव समजाऊन सांगितला, हया प्रस्तावामध्येही आयुर्विमा महामंडळाने नागरी पाणी पुरवठा योजनेकरिता कर्ज मंजूर केलेले असून मंडळाचे सदस्य सचिव/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांना आयुर्विमा महामंडळाशी करारनामा सादर करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा प्रस्ताव आहे. चर्चेनंतर खालीलप्रमाणे ठराव संमत केला.

<u>ठराव :</u>

असा ठराव करण्यांत येतो की, आयुर्विमा महामंडळाचे पत्र क्र. आयएनव्ही/पीएस/डी, दि. २६.२.९६ (परिशिष्ट-आ) अन्वये मंजूर करण्यांत आलेले कर्ज रु. ११९५.00 लक्ष कर्ज उभारणी सदर पत्रासोबत जोडण्यांत आलेल्या अटी व शर्तीनुसार व्हावी व मंडळाची सामान्य मुद्रा (कॉमन सील) उठवून आयुर्विमा महामंडळास करारनामा करण्यासाठी मंडळाचे सदस्य सचिव/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.